दैनिक
● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●

# मराठवाडा पत्र

गुरूवार
६.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३००
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 








# आ.सुरेश धस आधुनिक भागीरथ

## खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे लोकार्पण,मुख्यमंत्र्यांनी दिले दुष्काळमुक्तीचे आश्वासन



**बीड । प्रतिनिधी**

आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या लोकार्पण सोहळ्यानंतर आमदार सुरेश धस तसेच पंकजा मुंडे यांनी भाषण केले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषण केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आमदार सुरेश धस यांचा उल्लेख करताना त्यांना 'आधुनिक भागीरथ' असे म्हटले आहे. तसेच या योजनेचे श्रेय मुख्यमंत्र्यांनी सुरेश धस यांना दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वात आधी या प्रकल्पाला २०२२ ▶▶पान २ वर

## 'मेरे पास देवेंद्र फडणवीस साहेबांचा आशीर्वाद है''



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील आष्टीमधील खुंटेफळ इथल्या संचिन प्रकल्पाचे उद्धाटन झाले. भाजप आमदार सुरेश धस यांच्या मतदारसंघातील हा कार्यक्रम होता. यावेळी आमदार धस यांनी भाषणात जोरदार टोलेबाजी केली. याच खुंटेफळ इथं दगड मारली गेली. पण 'दुश्मन' चित्रपटाप्रमाणे मी या लोकांची ▶▶पान २ वर

# अखेर ५० वर्षानंतर खा.बजरंगबप्पांच्या कार्यकाळात रेल्वेचे स्वप्न साकार झाले

## स्वप्नपूर्ती : बीड ते राजूरी झाली जलदगती चाचणी

**बीड । प्रतिनिधी**

अखेर बीड रेल्वे स्टेशनवर १० डब्यांची रेल थांबली असून, जलदगती चाचणी घेण्यात आली. यामुळे लोहमार्गावर बीड आले आहे. पटरीचे काम पूर्ण होऊन जलदगती चाचणी झाली असलीतरी प्रवास करण्यासाठी जवळपास तीन महिने प्रतिक्षा करावी लागणार आहे. यामुळे रेल्वे आल्याचा आनंद साजरा होत असला तरी लगेच प्रवास करता येत नसल्याने रेल्वेने प्रवास करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काही दिवस प्रतिक्षा करावी लागणार आहे. परळी-बीड- अहमदनगर रल्वे मार्ग होण्याचे बीडकरांचे ५० वर्षांपासूनचे स्वप्न



आहे. यासाठी प्रदिर्घ काळ लागला असून मागील १५ वर्षांपूर्वी या कामाला गती आली. एक-एक टप्पा पार करीत अखेर बीड स्टेशनवर रेल्वे दाखल झाली. बीड रेल्वे स्टेशनवर मंगळवारी सायंकाळीच १० डब्यांची रेल्वे दाखल झाली होती. प्रशासनाने जाहीर केल्या प्रमाणे बुधवारी सकाळी या रेल्वेचे पूजन करुन बीड ते राजुरी अशी जलदगती (हायस्पीड ) चाचणी करण्यात आली. काल पासून बीडकरांनी रेल्वे स्टेशनवर गर्दी केली होती. अनेकांनी रेल्वे कधी पाहिलेली नव्हती अशांनी काल उभ्या रेल्वे मध्ये बसवण्याचा आनंद घेतला ५० वर्षांनंतर रेल्वेचे स्वप्न साकार झाल्याचा आनंद बीडकरांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहताना दिसत आहे. डिसेंबर २०२४ मध्येच अहमदनगर ते राजुरी पर्यंत रेल्वे आली होती. ती आता अहमदनगर ते बीड पर्यंत आली. बीडचे नाव आता लोहमार्गावर आले आहे. रेल्वे बीड येथे दाखल झाली असली तरी प्रत्यक्षात प्रवास करण्यासाठी जवळपास तीन महिन्यांची प्रतिक्षा करावी लागणार आहे. ▶▶पान २ वर

# रेल्वे पुलांचा विषय आ.क्षीरसागरांनी रेल्वे सुरक्षा आयुक्तांसमोर मांडला

**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदारसंघातील काही ठिकाणी रेल्वे ब्रीज नसल्यामुळे वाहतुकीस अडचण होत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान बुधवारी (दि.५) रोजी बीड रेल्वेची हाय स्पीड टेस्ट करण्यासाठी रेल्वेचे सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा आले असता त्यांच्यासमोर आ.संदीप क्षीरसागर यांनी हा विषय मांडला. बीड मतदारसंघातील क्षेत्रांतर्गत शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा, बरगवाडी, जवळागिरी तसेच बीड तालुक्यातील चर्हाटा येथे जाण्यासाठी रेल्वे पूल करण्यात आला नाही. त्यामुळे या गावांमध्ये वाहतुकीस मोठी अडचण होत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. शासन आणि प्रशासनाकडे याविषयी आ.क्षीरसागर यांनी अनेकवेळा पत्रव्यवहार आणि बैठका घेतल्या आहेत. यावेळीही, अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाची जलदगती चाचणी



### मतदारसंघात ब्रीज नसलेल्या ठिकाणी वाहतुकीस अडचण

करण्यासाठी पुणे विभागाचे रेल्वे वाहतूक सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा यांच्यासह रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आले असता आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांची भेट घेऊन रेल्वे पुलांचा विषय त्यांच्यासमोर ▶▶पान २ वर

# वाल्मीक कराडला हायकोर्टाचा दिलासा


## ईडी चौकशीची मागणी करणारी याचिका फेटाळली



**बीड । प्रतिनिधी**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि खंडणीच्या आरोपाखाली अटक असलेला धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराडच्या संपत्तीची ईडी चौकशी करावी, अशा मागणीची याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली होती. मात्र, हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. हायकोर्टाने याचिका फेटाळून लावत याचिकाकर्त्यांना २० हजार रुपयांचा दंड देखील ठोठावला. यामुळे हा वाल्मीक कराडसाठी दिलासा मानला जात आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने बीड जिल्ह्यास राज्यातील वातावरण ढवळून निघाले होते. याप्रकरणी ८ आरोपींना अटक केली असून सर्वांवर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आली. धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड हा संतोष देशमुख यांच्या हत्येचा खरा मास्टरमाइंड असल्याचा आरोप होत आहे. तसेच चौकशी दरम्यान वाल्मीक कराडकडे कोट्यवधीची संपत्ती असल्याची माहिती समोर आली. त्यामुळे वाल्मीक कराडची ईडीमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी विरोधकांकडून केली जात होती. त्यातच वाल्मीक कराडविरोधात ईडीने स्वतंत्र गुन्हा ▶▶पान २ वर

# बीड शहरातील नगरोत्थान योजनेंतर्गत सिमेंट रस्त्यावरील खड्डे अपघाताला निमंत्रण



## नगरविकास मंत्री,सचिवांना तक्रार-डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नगरोत्थान योजनेतुन पहिल्या टप्प्यात ७० कोटी आणि दुस-या टप्यात ६९ कोटी अशी तब्बल १४९ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्ते व नाली बांधकाम पैकी काही रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असुन माने काम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोडवरील रस्त्याची वर्षभरातच दुरावस्था झाली. माय कॉम्प्लेक्स ते यशंतराव चव्हाण नाट्यगृह हा रस्ता मोठ्या रहदारीचा रस्ता आहे विविध व्यवसाय दुकाने क्लासेस दवाखाने या रस्त्यावर आहेत त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात कायम वर्दळ या ठिकाणी असते. रस्त्याच्या मधोमध पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे याठिकाणी अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. अशा प्रकारची स्थिती अनेक ठिकाणी रस्त्यांवर आढळून येत आहे तर सिमेंट रस्त्यांची कामे करताना रस्त्यांच्या मधोमध वाहतूकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारी रोहित्र व वीजेचे खांब हटविण्यात आले नाहीत.संबधित प्रकरणात कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , शेख युनुस,रामनाथ ▶▶पान २ वर

# संत तुकाराम महाराजांच्या वंशजाने उचलले टोकाचे पाऊल



**बीड । प्रतिनिधी**

संत तुकाराम यांचे ११ वंशज प्रसिद्ध व्याख्याते हभप शिरीष महाराज मोरे यांनी आत्महत्या केली असल्याचे समोर आले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शिरीष महाराजांनी उचललेल्या टोकाच्या पावलाने देहू गावावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिरीष महाराज यांचा मृतदेह सकाळी राहत्या घरात आढळून आला. राहत्या घरात त्यांनी गळफास घेत आत्महत्या केली. या ▶▶पान २ वर



# किती मी राखू तुमची...



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प वक्री जाऊ नयेत यासाठीच्या आपल्या धडपडीचे अधिक कौतुक करावे की आपल्याविषयीचे अंदाज तंतोतंत खरे ठरावेत यासाठी ट्रम्प अध्यक्षपदी आल्यापासून आपण अहोरात्र करत असलेल्या प्रयत्नांचे अधिक, हे ठरवणे अवघड. अमेरिकी वाहनांवर आपल्या देशात लावल्या जाणाऱ्या कराविषयी ट्रम्प रागावलेले आहेत. हा राग त्यांनी अनेकदा जाहीरपणे व्यक्त केलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिकी दौरा सुरू होण्यासाठी या मुद्द्यावर ट्रम्प यांस 'शांत' करणे गरजेचे. त्यातूनच ताज्या अर्थसंकल्पात हे आयात शुल्क तब्बल ५० टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून हे आयात शुल्क आता १२५ टक्क्यांवरून ७० टक्के इतके कमी होईल. याचा अर्थ केवळ 'हार्ले डेव्हिडसन' दुचाकीच नव्हे तर इलॉन मस्क यांची 'टेस्ला' वीज कारही भारतात स्वस्त होऊ शकेल. हे अर्थातच ट्रम्प यांस खूश करण्यासाठी. त्यात पंतप्रधानांचा संभाव्य अमेरिका दौरा. या पार्श्वभूमीवर आपण अमेरिकेसमोर असे कंबरेत वाकत असताना ट्रम्प यांनी ताज्या तलवारबाजीत त्यांच्या शेजारील मेक्सिको, कॅनडा आणि दूरवरील चीन या देशांवर अतिरिक्त कर लागू केले. शेजारील मेक्सिको, कॅनडा यासाठी ते २५ टक्के इतके असतील तर चीनसाठी १० टक्के. म्हणजे या तीन देशांची उत्पादने अमेरिकेत इतक्या टक्क्यांनी महाग होतील आणि अमेरिकेच्या मोटारी, दुचाक्या यांच्या किमती भारतात तितक्या टक्क्यांनी कमी होतील. हे दोन्ही एकाच दिवशी झाले. यावरून या निर्णयाचे महत्त्व जसे लक्षात येते तसेच हे असे निर्णय घेणाऱ्यांची मानसिकताही दाखवून देते. ट्रम्प यांनी जे केले त्याचे वर्णन जागतिक स्तरावर 'व्यापारयुद्धाचे रणशिंग', 'नव्या व्यापारयुद्धास सुरुवात' आदी शब्दांत केले जाते. ते योग्यच. तथापि त्यावर भाष्य करताना एक प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे तो म्हणजे, आपले काय होणार? याचे कारण ट्रम्प चीनविरोधात फोडत असलेल्या डरकाळ्यांमुळे आपल्याकडे एका वर्गास होत असलेल्या गुदगुल्या. आपल्या शत्रूचा काटा परस्पर काढला जात असेल तर ते कोणास आवडणार नाही? पण चीनविषयी ट्रम्प यांच्या भूमिकेकडे इतक्या कोत्या नजरेने पाहणे हेच आपल्यासाठी अयोग्य असू शकते, हे सत्य लक्षात घेणे महत्त्वाचे. याचा अर्थ असा की ट्रम्प जितके चीनविरोधात डरकाळ्या फोडत आहेत तितके ते खरोखरच त्या देशाविरोधात जाऊ इच्छितात का हा प्रश्न. तशी त्यांची खरोखरच इच्छा असती तर त्यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांस जातीने स्वत:च्या अध्यक्षावरोहणाचे निमंत्रण दिले नसते. ट्रम्प यांनी ज्यांना वैयक्तिक निमंत्रणे दिली त्यात क्षी वरच्या यादीत आहेत, ही बाब विसरता नये. तसेच त्यांनी कोणास तसे निमंत्रण दिले नाही याकडेही दुर्लक्ष करता नये. ट्रम्प हे केवळ जिनपिंग यांस शपथविधी सोहळ्यास निमंत्रण देण्यावरच थांबलेले नाहीत, ही आपल्यासाठी आणखी गंभीर बाब. अध्यक्षपदी आरूढ झाल्यावर ट्रम्प यांनी काही जागतिक नेत्यांस स्वत: जातीने फोन केले आणि आगामी वाटचालीची चर्चा केली. त्यातही चीनचे जिनपिंग यांचा समावेश होता. ट्रम्प यांनी स्वत:हून असा फोनसंपर्क कोणाशी साधला नाही, हे सांगण्याची गरज नाही. जिनपिंग यांच्याशी तो साधला ही बाब अधिक महत्त्वाची. असे असताना चीनविरोधात ट्रम्प किती टोकाला जातील, या प्रश्नाचा विचार गांभीर्याने करायला हवा. कारण या प्रश्नाच्या प्रामाणिक उत्तरावर आपण आणि चीन तसेच अमेरिका आणि आपण यांचे भावी संबंध अवलंबून आहेत. ट्रम्प यांच्या आधीचे डेमॉक्रॅट्स जो बायडेन आपल्याकडे चीनच्या नजरेतून पाहत. म्हणजे चीन या साम्यवादी, हुकूमशाही देशास पर्याय म्हणून त्यांच्या नजरेतून भारताची उपयुक्तता होती. त्यामुळे चीनचे नाक खाजवण्यासाठी, त्या देशास इशारा देण्यासाठी वा चीनविरोधातील प्यादे या अर्थाने डेमॉक्रॅट्सच्या नजरेत भारताचे महत्त्व होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय निर्बंध लादलेल्या रशियाशी असलेल्या आपल्या संबंधांकडे अमेरिकेने काणाडोळा केला. ट्रम्प यांची रिपब्लिकन नजर यापेक्षा वेगळी आहे. ते थेट चीनशी चीन म्हणूनच व्यवहार करू पाहतात. त्यांना चीनला पर्याय म्हणून कोणी एक साथीदार राखलेला बरा, असे वाटत नाही. या त्यांच्या दृष्टिकोनाची तुलना शीतयुद्धाच्या काळात अमेरिकी नेतृत्वाने अखेर त्यांचा तेव्हाचा कडवा शत्रू असलेल्या सोविएत युनियनच्या नेतृत्वाशी थेट संधान साधले, या घटनेशी करता येईल. सोविएत रशियाचे अध्यक्ष ब्रेझनेव्ह हे या काळात 'व्हाइट हाऊस'चा पाहुणचार घेऊन आले होते. त्या वेळी असा प्रयत्न अमेरिका आणि सोविएत युनियन या दोघांनीही करण्यामागील एक कारण या शत्रुत्वाचा फायदा उठवण्याचा अन्य देशांकडून होणारा प्रयत्न; हे होते. त्याचप्रमाणे चीन आणि अमेरिका सध्याही करू पाहतात किंवा काय, हा प्रश्न. तो पडतो कारण ट्रम्प जितक्या तीव्रतेने मेक्सिको, कॅनडा आदी देशांवर धावून जातात ती त्यांची आक्रमकता चीनविरोधात दिसत नाही. हे 'घर में घुस के मारेंगे'चे स्मरण करून देणारे असू शकते. आज चीन हा अमेरिकेचा सर्वात मोठा धनको आहे. अमेरिकी रोखे, डॉलर्समधील गुंतवणूक आणि अमेरिकी कंपन्यांची उत्पादन केंद्रे चीनमध्ये आहेत. त्यामुळे अशा देशाशी थेट दोन हात करण्यापेक्षा सामोपचाराने मतभेद मिटवता आल्यास बरे, असा विचार ट्रम्प यांनी केला नसेलच, असे नाही. शेवटी त्यांचा उजवा हात असलेल्या मस्क याचा सगळ्यात मोठा 'टेस्ला' कारखानादेखील चीनमध्येच आहे, हे कसे विसरणार? याचा अर्थ हे पडद्यामागील चातुर्य प्रत्यक्षात येत असेल तर आपणासाठी ती स्पष्ट धोक्याची घंटा ठरते. कारण यापुढे आपण चीनचा बागुलबुवा सतत पुढे करत अमेरिकेकडून आपणास हवे ते काढून घेऊ शकणार नाही. म्हणून ट्रम्प हे भारताचा उल्लेख अमेरिकेच्या व्यापारशत्रूंच्या यादीत करतात, ही बाब दुर्लक्ष करू नये अशी. त्याचा अर्थ ''चीनचे मी काय ते बघतो, आधी तुम्ही सरळ व्हा'' असा सूर ट्रम्प लावणारच नाहीत याची खात्री नाही. किंबहुना ट्रम्प यांची कसलीच खात्री देता येत नाही, हीच तर खरी अडचण. त्यामुळे ट्रम्प यांस खूश करण्याचा प्रयत्न आपण किती काळ करणार, हा मुद्दा! मोदींच्या अमेरिका भेटीच्या पार्श्वभूमीवर ऐन अर्थसंकल्पात आपण ही आयात शुल्क सवलत दिली नसती तर तो कदाचित पडला नसता. पण ट्रम्प यांच्या शपथविधीप्रसंगी आपण अमेरिकेतील १८ हजार अनधिकृत भारतीयांस परत मायदेशी आणण्याची कबुली देतो, आपले सरकार आता आम्ही अमेरिकेकडून अधिक तेल/ नैसर्गिक वायू खरेदी करू अशी स्वत:हून घोषणा करते, आपला अर्थसंकल्प अमेरिकेबरोबरचा अणुकरार पुनर्जीवित करण्यासाठी पावले उचलण्याची भाषा करतो आणि ट्रम्प यांनी डोळे वटारायच्या आत आपण 'हार्ले डेव्हिडसन'सह 'टेस्ला'वरील आयात शुल्क आपणहून कमी करतो, या सगळ्याचा अर्थ कसा लावणार? कोणत्याही नजरेतून पाहिले तरी या सगळ्याचा अर्थ आपण ट्रम्प यांच्यासमोर लोटांगण घालतो किंवा काय, असाच होईल. हे असे मनमोहन सिंग अथवा विरोधी पक्षीय सरकारने केले असते तर विद्यमान सत्ताधाऱ्यांची प्रतिक्रिया काय असली असती असा राजकीय प्रश्न न विचारतादेखील ट्रम्प यांची मर्जी आपण किती राखणार या प्रश्नास भिडावे लागेल.

पान १ वरून

### आ.सुरेश धस आधुनिक...

मध्ये आमच्या सरकारने सुप्रमा दिली. या प्रकल्पाला ११ हजार कोटी रुपयांची सुप्रमा दिली आहे. कारण सुरेश धस एकदा मागे लागले तर ते डोके खाऊन टाकतात, हा शब्द चुकीचा असला तरी त्यांच्यामुळे आता हे काम अत्यंत वेगाने सुरू असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. धाराशिव जिल्हा आणि आष्टी तालुक्यात देखील मोठ्या प्रमाणात पाणी आपण आणणार असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. या भागातला दुष्काळ आता भूतकाळ होणार आहे, असा विश्वास देखील मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. संपूर्ण परिसर हा बागायती झालेला असेल असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०१४-१५ मध्ये दुष्काळाच्या काळात आपल्या सरकारने जलयुक्त शिवार योजना सुरू केली. या योजनेमुळे अनेक गावे पाणीदार झाली. उच्च न्यायालयाच्या समितीने देखील इतक्या वर्षात पहिल्यांदा भूजल पातळी वाढली असल्याचे सांगितले. मात्र, मराठवाड्याला कायम दुष्काळ मुक्त करायचे असेल तर जलसंधारणाच्या कामाबरोबरच जोपर्यंत पश्चिम वाहिन्यांचे पाणी समुद्रात जाणारे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणत नाही, तोपर्यंत मराठवाडा दुष्काळमुक्त होऊ शकत नाही. नदीजोड प्रकल्पाची मूळ संकल्पना बाळासाहेब विखे पाटील यांनी मांडली होती. ती संकल्पना पूर्ण करण्याचे काम आता त्यांचे सुपुत्र राधाकृष्ण विखे पाटील यांना मिळाले आहे. याचा आनंद असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. नाशिक आणि नगर विरुद्ध उर्वरित मराठवाडा असा संघर्ष पाहायला मिळत आहे. तो संघर्ष देखील भविष्यात दूर होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, दोन राज्यांतर्गत नदी जोड प्रकल्पांना केंद्र सरकारच्या वतीने मदत केली जाते. मात्र आम्हाला राज्यांसोबत नाही तर आमच्या राज्यातच नदीजोड प्रकल्प राबवायचा आहे. त्याला देखील निधी देण्यास मान्यता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मराठवाड्याला दुष्काळ मुक्त करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. त्यामुळे आमची भावी पिढी दुष्काळ पाहणार नाही, असा विश्वास देखील फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ही उपसा सिंचन योजना देखील सौरऊर्जेवर चालणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, ५३ टीएमसी पाणी हे जायकवाडी धरणामध्ये येणार आहे. या माध्यमातून मराठवाडा दुष्काळ मुक्त करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे. पुढील एका वर्षात नदी जोड प्रकल्पाचे काम सुरू होणार असल्याचे देखील फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

### मरे पास देवेंद्र...

पुन्हा मनं जिंकली, अशी कटू आठवण धस यांनी सांगितली. सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी असलेल्या मैत्रीची आठवण सांगताना, १९९९ ते २००४ या कालावधीत मी त्यांचाबरोबर होतो. हाताखाली काम करताना, त्यांच्या अभ्यासासाठी लागणाऱ्या कागदपत्रांचे बॉक्स खालून वर काढून द्यायचो. २०१९ मध्ये माझ्यावर, माझ्या कुटुंबावर वेगवेगळी कटकारस्थाने करून माझी बदनामी करण्यात आली. त्रास दिला. हे सांगताना, २०१९ मध्ये बहुमतात येऊन सुद्धा, आपण मुख्यमंत्री झाला नाहीत. जनाधार असून सुद्धा सत्तेपासून लांब राहावं लागलं. राजकारणातून उद्ध्वस्त करण्याचे कटकारस्थान करण्यात आले. परंतु कुशाग्र बुद्धिने संघर्ष केला, त्यावर मात केली. त्याला तोडच नाही. बिनजोड पैलवान म्हणतात, तो हा पैलवान आहे, असा उल्लेख करताना सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. 'बिनजोड पैलवान आहात तुम्ही. अभिमान आहे, साहेब. विरोधी पक्षनेता असताना १०६, वरचे २६, अशा आमदारांची मोट जुळवून ठेवली. मला निवडणूक आणण्यासाठी पंकजाताई आणि तुम्ही मला मदत केली. या काळात आपला एकही आमदार कोणाच्या दारात गेला नाही. तुमच्या प्रेमामुळे एकही माणूस फुटला नाही. आमच्यांवर त्या कालावधीत ३०-३० केस झाल्या. रात्री पोलिस पाठवायचे. इतके वाईट दिवस काढले. पण कोणाच्या दारात गेलो नाही', याची आठवण सुरेश धस यांनी करून दिली. ''दिवार' चित्रपटामधील एका सीनची आठवण करून देताना, अमिताभ बच्चन अन् शशी कपूर हे भाऊ या चित्रपटात दाखवले आहेत. शशी कपूर पोलिस असतो. अमिताभ बच्चन झंटा-बंटा दाखवला. अमिताभ शशी कपूरला म्हणतो, मेरे पास बंगला है, गाड़ी है, बैंक बैलेंस है, तुम्हारे पास क्या है. त्यावर शशी कपूर म्हणतो, मेरे पास माँ है. तसा आईचा आशीर्वाद तुम्हाला आतापर्यंत मिळतो आहे. माझी तर आई गेली. वडील गेले. माझी दुसरी आई जिवंत आहे. ती लपवली नाही. सभागृहामध्ये तुम्हाला विचारले आईचे नाव घेऊन का? तेव्हा मी माझ्या दुसऱ्या आईचे सुद्धा नाव घेतले', अशी भावनात्मक मुद्दा सुरेश धस यांनी मांडला. 'आता त्यावेळी बऱ्याच जणांना आशा होती. याला का मिळतंय का? काही नको. मंत्रीपद नको, पालकमंत्रिपद नको. आणखी दुसरं काही नको. पण चार टीएमसी अन् दुसरीकडे साडेतीन टीएमसी द्या. मला हिणवतात. याचं काय होणार म्हणून, हिणवतात. नुसता मुख्यमंत्री-मुख्यमंत्री करतो म्हणून हिणवतात. तेव्हा म्हणतात, तेरे पास क्या है. तेव्हा मी म्हणतो, 'मेरे पास देवेंद्र फडणवीससाहेबांचा आशीर्वाद है'', असा टोला सुरेश धस यांनी हिणवणाऱ्यांना लगावला.

### अखेर ५० वर्षानंतर...

पान १ वरून

कारण अहमदनगर-बीड मार्गा वर धावणारी रेल विजेवरील असून राजुरी बीड वीज वाहिनीचे काम झालेले नाही. सध्या चाचणी करण्यात येत असलेले डिझेल इंजिन असून डिझेल गाडी चालू करणे खर्चिक आहे. यामुळे वीज वाहिनीचे काम पूर्ण होईपर्यंत बीड करांना रेल्वेने प्रवास करता येणार नाही.

### वाल्मीक कराडला...

दाखल करून तपास सुरू करण्याची मागणी करत हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. माहिती अधिकार कार्यकर्ता केतन तिरोडकर यांनी वाल्मीक कराडची ईडी चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली. मात्र, हायकोर्टाने ती याचिका फेटाळून लावली. याचिकाकर्ते केतन तिरोडकर यांना स्वैर याचिका दाखल केल्याबद्दल २० हजारांचा दंड ठोठावला. तिरोडकर यांच्या वकिलांनी याचिका माघारी घेण्याचे मान्य केले. याचिकाकर्त्यांचा हेतू याचिकेतून स्पष्ट होत नसल्याने याचिका सुनावणीस योग्य नाही, असे मत मुख्य न्यायमूर्तींचा व्यक्त करत सुनावणीस नकार दिला. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास हायकोर्टाच्या देखरेखीखाली एसआयटीमार्फत सुरू करावा, अशी मागणी याचिकेतून करण्यात आली होती. या प्रकरणात एका कॅबिनेट मंत्र्याचे नाव सातत्याने येत आहे. त्यामुळे पोलिसांच्या तपासात अनेक मर्यादा येत असल्याचा आरोप याचिकेतून करण्यात आला. या प्रकरणी मंत्री महोदयांशी संबंधित अनेक कंपन्या आणि मालमत्तासमोर येत असल्याने याचिकेत निवडणूक आयोगालाही प्रतिवादी करण्यात आले होते. २२ जानेवारी रोजी वाल्मीक कराडला बीड विशेष न्यायालयाकडून १४ दिवसांची कोठडी सुनावण्यात आली होती. काल या कोठडीची मुदत संपली. त्यानंतर कराडला कोर्टात हजर न करताच त्याची न्यायालयीन कोठडी आणखी १४ दिवसांनी वाढवली आहे. त्यामुळे वाल्मीक कराडचा कोठडीतील मुक्काम १८ फेब्रुवारीपर्यंत वाढला आहे.

### बीड शहरातील नगरोत्थान...

खोड,शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे , बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्षआप माजी सैनिक अशोक येडे यांनी जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे केली असुन दि.१० सोमवार रोजी त्याच खड्ड्यात बेशरमांची वृक्षलागवड करून लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे. बीड शहरातील माने काम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह दरम्यान वर्षभरापूर्वी तयार करण्यात आलेल्या नवीन सिनेंट रस्त्यांवर तडे आणि मोठमोठे खड्डे पडले असुन त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. माने कॉम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह हा रस्ता मोठ्या रहदारीचा रस्ता आहे विविध व्यवसायिक दुकाने शाळांचे क्लासेस दवाखाने याच रस्त्यावर आहेत त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात कायम वर्दळ या रस्त्यावर असते परंतु या रस्त्याच्या मधोमध मोठा खड्डा पडलेला आहे. या खड्ड्यात वाहनांचे चाक अडकून पडल्याने घसरून अनेक जणांचा अपघात झाला आहे . याबाबत नागरिकांनी वेळोवेळी प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. परंतु त्याकडे नगर परिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आले. अखेर नाईलाजाने या भागातील नागरिकांकडून माती खड्डे टाकून तो बुजवण्याचा प्रयत्न केला होता .परंतु काही दिवसातच ती माती ,खडी निघून जाते .काही नागरिकांनी त्यामध्ये सिमेंट क्राक्रीट टाकले होते .परंतु नव्याने टाकलेले काँक्रीट जुन्याला पकड धरत नसल्यामुळे ते लगेच निघून जाते .पाऊस पडला किंवा पाणी साचल्यास खड्डा दिसत नाही. त्यावेळी अनेकांना पाठीच्या मणक्याला दणका बसण्याचा अनुभव या ठिकाणी आलेला आहे. नगरपालिका प्रशासना या समस्यांकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डा बुजवावा व नागरीकांना त्रासातुन मुक्त करावी अशी मागणी सचिन आदनाक,दिपक कुलकर्णी, अर्जुन काळे, ईश्वर गुंजाळ,प्रशांत माने या नागरिकांनी केली आहे.

### रेल्वे पुलांचा...

मांडला. तसेच रेल्वे विभागाने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव याप्रकरणी तोडगा काढण्यासाठी कार्यवाही करण्याची मागणी केली. याप्रसंगी खा.बजरंग सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष गणेश वरेकर आदी उपस्थित होते.

### संत तुकाराम महाराजांच्या...

घटनेने एकच खळबळ उडाली. शिरीष महाराज मोरे यांच्या अकाली जाण्याने त्यांच्या कुटुंबीयांना आणि सहकाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. आत्महत्येचे नेमकं कारण समोर आले नाही. शिरीष महाराज हे लवकरच विवाहबद्ध होणार होते. त्यांच्या लग्नाचा टिळा कार्यक्रमही पार पडला होता. शिरीष महाराज मोरे यांनी उचलेले पाऊल हे समस्त देहू करांसाठी व मोरे कुटुंबीयांसाठी धार्मिक अध्यात्मिक आणि कौटुंबिक नुकसान करणारी आहे. महाराजांचे निधन अकस्मात झालं आहे. या संदर्भातली चौकशी पोलीस करतील, मात्र तोपर्यंत त्यांच्या चाहत्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता या दु:खात आम्हाला आधार द्यावा असे आवाहन त्यांच्या कुटुंबीयांच्यावतीने करण्यात आले आहे. शिरीष महाराज मोरे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सक्रीय होते. संघाचे ते प्रचारक होते. त्याशिवाय शिवशंभो प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. ज्याच्या कपाळावर टिळा नाही, त्यांच्याकडून खरेदी करणे टाळा, असे वादग्रस्त आवाहन केल्याने शिरीष महाराज हे चर्चेत आले होते.

# देवेंद्र फडणवीस बाहुबली तर मी शिवगामिनी

## पंकजा मुंडे यांचे आष्टीत जोरदार भाषण



बीड, (प्रतिनिधी):-आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या लोकार्पण सोहळ्यानंतर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी भाषण केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी आमदार सुरेश धस यांना मिश्किल टोला देखील लगावला आहे. या जिल्ह्याचे आमदार ज्यांना २००९ मध्ये पहिला गुलाल लागला तो भारतीय जनता पक्षाकडूनच लागला ते आता पुन्हा २०२४ मध्ये आमदार म्हणून निवडून आले आहेत आणि ज्यांनी या सभेचे आयोजन करण्यासाठी मोठा सहभाग घेतला आहे ते म्हणजे सुरेश धस, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी आमदार सुरेश धस यांचा उल्लेख केला आहे. पंकजा मुंडे म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दल नेहमीच आदरभाव आहे. मात्र आज त्यांच्याबद्दल ममत्त्व भाव निर्माण होत असल्याचे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. आज फडणीसांना बाहुबली म्हणणारे पूर्वी मला शिवगामिनी म्हणत होते. त्यामुळे माझे वचनच माझे शासन आहे, असे देखील पंकजा यांनी म्हटले आहे. बोलणार एक आणि करणार एक हे माझ्या रक्तात नाही. मी गोपीनाथ मुंडे यांची लेक आहे. हे लक्षात ठेवा, अशा शब्दात मंत्री पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांना प्रत्युत्तर दिले आहे. सुरेश धस यांना मी आज देखील अण्णाच म्हणते, असं देखील पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. दरम्यान, गोपीनाथ मुंडेंएवढा पहाडासारखा माणूस याच जिल्ह्याने महाराष्ट्राला दिल्याचेही सुरेश धस यांनी म्हटले. तसेच, शिरुर आणि पाटोदा तालुक्यासाठी आणखी ३.७ टीएमसी पाणी देण्याची मागणी केली. देवेंद्र बाहुबली हेच आमचं काम करु शकतात, तुमच्याकडूनच आम्हाला अपेक्षा आहे, असे म्हणत ही योजना मंजूर झाल्यास मी जिवंत राहिल किंवा नाही, पण या मतदारसंघातून भाजपचाच आमदार राहिल, असे आश्वासन आमदार सुरेश धस यांनी दिले आहे.






Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### माजलगावात होळकर यांच्या जीवन चरित्रावरील चित्रप्रदर्शनी व हळदी कुंकु समारंभ
#### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला मंडळाचा पुढाकार

**माजलगाव । प्रतिनिधी**

कुशल प्रशासक पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावरील त्रिजन्मशताब्दी निमित्त चित्रप्रदर्शनी व हळदी कुंकू समारंभाचे अयोजन येथील होळकर महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. चला मकर संक्रमण उत्सव साजरा करूया, राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यामातेचा इतिहास समजून घेऊया. व समाज संघटन मजबूत करूया या थीम खाली उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाला. जवळपास ३००० महिलांनी सहभागी होत हळदी कुंकू व चित्र प्रदर्शनी चा लाभ घेतला. या भव्य चित्र प्रदर्शनी चे उद्घाटन माजलगावच्या माजी उपनगराध्यक्षा सौ. राधाताई तुकाराम येवले यांनी केले. दिनांक २६ जानेवारी २०२५ रविवार रोजी राजमाता अहिल्यादेवी होळकर महिला मंडळ यांनी एकत्रित येऊन अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील चित्र प्रदर्शनी आणि आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य करण्यामध्ये ज्या महिलांचे योगदान आहे अशा महिलांच्या त्यागाची व कार्याचे वर्णन करणारी चित्र प्रदर्शनी लावून आणि त्यांची जीवन चरित्र सर्व महिलांना सांगून हळदीकुंकवाच्या निमित्ताने एक विशेष संदेश देण्याचा प्रयत्न या माता भगिनींनी केला. कार्यक्रमासाठी प्रतिभा सोन्नर यांचेसह सर्वच महिलांनी परिश्रम घेतले.

### आरक्षणासाठी जातनिहाय जनगणना मोदी सरकार कधी करणार: वसंत मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत देशामध्ये १० वर्षापेक्षा जास्त कालावधी राष्ट्रीय सेवक संघाच्या विचारधारेचे भारतीय जनता पार्टीचे सरकार सत्तेत आले असून देशातील गोरगरीब जनतेसाठी जात निहाय जनगणना करण्याची मागणी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी संसदेत व जनतेच्या दरबारात मागणी करूनही केंद्रातील व राज्यातील अकार्यक्षम सरकार जातीनिहाय जनगणना का करीत नाही असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. गोरगरीब जनता, दुर्बल घटक, ओबीसी, अल्पसंख्यांक, एससी एसटी यांची देशात जातनिहाय वेगवेगळ्या निकषांतर्गत आरक्षण व विविध सवलती देण्यासंदर्भात शासन स्तरावर विविध मुद्देनिहा निर्णय घेतले जातात. त्यामध्ये शैक्षणिक आर्थिक व्यावसायिक सामाजिक निकष धार्मिक शासकीय नोकऱ्यांची सध्याची स्थिती, राजकीय आरक्षणासंदर्भात संपूर्ण देशातील व राज्यातील माहिती वेगवेगळ्या मुद्देनिहाय जातीनिहाय जनगणनेमध्ये एकत्र करून माहिती प्राप्त होते. त्यावर शासन स्तरात खर्चाच्या निधीसाठी अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक जातीची व धर्माची किती देशात व राज्यात लोकसंख्या आहे ती आकडेवारी प्राप्त झाल्यावर विविध निकषांतर्गत आर्थिक विकासासाठी निधी वर्ग केला जातो. जात निहाय जनगण करिता सध्या तर केंद्रातील अर्थसंकल्पीय अधिवेशनात कमी प्रमाणात निधी उपलब्ध करून दिलेला आहे. कारण देशातील सरकार हे जात निहाय जनगणनेला विरोध आरएसएस विचारधारेमुळे करणारे आहे . तसेच देशात आर एस एस ची संपूर्ण यंत्रणा आरक्षण रद्द करण्यासंदर्भात कामाला लावलेली आहे.जातिनिहाय जनगणने बाबत अनेक प्रकरणे न्यायालयीन चालू असून अद्यापही निकाल लागलेले नाहीत.

### माजलगावमध्ये भव्यदिव्य मूकनायक सोहळा निर्भिड पत्रकार संघाचे उपस्थित राहण्याचे आवाहन



**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्याला आदर्श निर्माण करुन देईल असा, मूकनायक पुरस्कार सोहळा दरवर्षी आयोजित केला जातो. त्या अनुषंगाने निर्भिड पत्रकार संघ माजलगावकडून शहरातील वैष्णव मंगल कार्यालय येथे गुरुवार (ता.६) रोजी दुपारी १२ वाजता भव्यदिव्य मूकनायक पुरस्कार वितरण सोहळा साजरा केला जात आहे.या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन निर्भिड पत्रकार संघाचे माजलगाव तालुका अध्यक्ष बाळासाहेब आडागळे यांच्यासह पत्रकार संघाने केले आहे. मूकनायक पुरस्कार वितरण सोहळस उदघाटक म्हणून आ.सुरेश धस, विशेषतः उपस्थिती रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर, तसेच अध्यक्ष म्हणून आ.प्रकाश सोळंके असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून खा.बजरंग सोनवणे,आ.संदिप क्षीरसागर,आ. विजयराजे पंडित,मोहन जगताप,बाबुराव पोटभरे,बदामराव पंडित, अशोक डक, ऑल इंडिया पँथर सेनेचे दिपक केदार, धर्मवीर प्रतिष्ठानचे बाजीराव चव्हाण,प्रशांत दैठणकर, मिलिंद ,सुनिता मलवारी,लोकपत्रकार भागवत तावरे,संग्राम धन्वे, सुनिल डोंगरे आदींची उपस्थिती असणार आहे.

### गड किल्ले हे शिवकालीन स्वराज्याचा प्राण होते: प्रा. डॉ. बी.डी. जाधवर

**नेकनुर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात इतिहास विभागाद्वारे शिवकालीन गडकिल्ल्यांचे महत्त्व या विषयावर दिनांक ४ फेब्रुवारी , २०२५ रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बलभीम महाविद्यालय,बीड येथील इतिहास विभाग प्रमुख, डॉ. बी .डी. जाधवर हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील खटउ समन्वयक प्रा.डॉ.मकबूल सलीम सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविकामधून इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. कांतराव कलाणे यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका स्पष्ट करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यानंतर प्रमुख अतिथी प्रा. डॉ. बी.डी. जाधवर यांनी शिवकालीन गडकिल्ले हे महाराष्ट्राचं ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संचित होय, जगातल्या कुठल्याही प्रदेशात नसतील एवढे डोंगरी किल्ले महाराष्ट्रात आहेत, शिवाजी महाराज हे केवळ दुर्गप्रेमी होते असे नाही तर ते दुर्गनिर्मिती शास्त्राचे तज्ज्ञ होते, गड किल्ले हे शिवरायांच्या स्वराज्याचा प्राण होता. असे मौलिक विचार याप्रसंगी मांडले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयातील खटउ समन्वयक प्रा. डॉ. मकबूल सलीम यांनी गड किल्ल्यांचे महत्त्व व त्याची आवश्यकता याची जाणीव छत्रपती शिवाजी महाराजांइतकी मध्यकाळात इतर भारतीय राज्यकर्त्यांना नव्हती, महाराजांनी सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर गडकोटांचा साज चढविला, अशा गडकोटांचे संवर्धन करणे आपली जबाबदारी आहे असे मत मांडले.

# आदिवासी संस्कृती ही श्रमिक व कर्मवादी आहे : उद्घाटक डॉ. वैजनाथ अनमुलवाड

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**



येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आदिवासी समुदाय : लोककला, संस्कृती आणि साहित्य या विषयावरील एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मराठी भाषा, वायय व संस्कृती अभ्यास संकुलातील डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांच्या हस्ते झाले.

भारतीय समाज विज्ञानाला विकासाचा सोपा मार्ग दाखविणारा मूलनिवासी आदिवासी हाच आहे. त्यांची मौखिक परंपरा व्यापक आहे. या परंपरेने समाजाच्या ज्ञान कक्षा विस्तृत केल्या. याचे प्रतिबिंब आदिवासी लोक साहित्यातून स्पष्टपणे जाणवते. ही स्पष्टता विशेषत: हा त्यांच्या संस्कृतीमधून चित्रित होते. आदिवासीएतर समाजापेक्षा आदिवासी समाज हा मूल्यांच्या दृष्टीने संपन्न आहे. या अर्थाने त्यांची संस्कृती आणि विचार श्रमवादी व कर्मवादी आहे असे प्रतिपादन डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी केले. या चर्चासत्राचे बीजभाषक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. तुकाराम रोंगटे यांनी बीजभाषणातून आदिवासी संस्कृती मूल्याधिष्ठित असून निसर्ग पूजक आहे. आदिवासी समुदाय लोककला, संस्कृती आणि साहित्य हा आजच्या काळात अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय बनला आहे. साहित्याची सुरुवात आदिवासी साहित्यातून झाली. मौखिक परंपरेने निर्माण झालेले साहित्य लोकसाहित्य आहे. लोकसाहित्य मानवी जीवनाचे प्रतिबिंब असून जीवनाचा आलेख रेखाटण्याची शक्ती आदिवासींच्या चित्रकलेत आहे. आदिवासी साहित्याची कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र अशा विविध साहित्य प्रकारातून विपुल लेखन होत आहे. या सर्वच लेखन प्रकारातून आदिवासी लेखक जीवनानुभावांना व्यक्त करताना नवविश्वाची जाणीव करून देतात. मराठी साहित्य विश्वाला समृद्ध करण्याचे कार्य आदिवासी साहित्याने केले. अध्यक्षीय समारोपातून महाविद्यालय विकास समिती निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे यांनी चर्चा सत्राला शुभेच्छा दिल्या.

# तुळजाभवानी अर्बनचा सामाजिक बांधिलकीचा वसा

## चंद्रकांत शेजुळ यांच्या वाढदिवसानिमित्त ५४ रक्तदात्यांचे रक्तदान



**माजलगाव । प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रातील मानबिंदू असलेल्या तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत शेजुळ यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकीचा वसा घेत रक्तदान शिबीर घेण्यात आले. या रक्तदान शिबीरात तब्बल ५४ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजासमोर आदर्श प्रस्थापित केला. सहकार क्षेत्रातील अव्वल असलेल्या तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ यांचा सोमवार, दि.३ फेब्रुवारी रोजी वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला.

### वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची गरज : चंद्रकांत शेजुळ

**तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यासाठी संस्थेचे ग्राहक, अधिकारी, कर्मचारी, समर्थक, आणि चाहत्यांची अक्षरशः रीघ लागली होती. यावेळी बोलताना चंद्रकांत शेजुळ म्हणाले, सार्वजनिक जीवनात काम करत असताना आपण समाजाचे काही तरी देणेकरी लागतो, या भावनेतून काम करणारे आम्ही आहोत. वाढदिवसाच्या निमित्ताने प्रत्येकाने समाजोपयोगी उपक्रम राबविणे ही काळची गरज आहे.**

### आदित्य कृषी महाविद्यालयाचा रूपेश कापूरकरची कृषी अधिकारीपदी निवड

**बीड । प्रतिनिधी**



आदित्य शिक्षण संस्थेतून पदवी घेऊन बाहेर पडलेला विद्यार्थी यशस्वी होतोच याचे समाधान वाटते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा. त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा. यासाठी महाविद्यालयात विविध स्पर्धा, तज्ज्ञांचे व्याख्यान, स्पर्धा परिक्षेची तयारी वेगवेगळे डे निमित्त विविध कार्यक्रम घेऊन पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास कसा होईल याकडे भर दिला जात असल्याने आज गोरगरिबांचे मुल शिक्षण घेऊन शासकीय नौकरी, विविध संस्थेत अधिकारी होतात याचे समाधान आहे. यशस्वी विद्यार्थी घडवणे हे संस्थेचे ध्येय असल्याचे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी केले. आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी रुपेश कापूरकर याची क्षेत्रीय ग्रामीण बँक मध्ये कृषी अधिकारी पदी निवड झाली. या निवडीबद्दल रूपेश याला शुभेच्छा देताना संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा बोलत होते. आयबीपीएस मार्फत क्षेत्रीय ग्रामीण बँक मध्ये विविध पदावर नियुक्ती बाबत राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेल्या परीक्षेतून पात्र उमेदवारांची निवड केली जाते. त्यामध्ये आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा रुपेश कापूरकर क्षत्रिय ग्रामीण बँक मध्ये कृषि अधिकारी SCALE-II या पदासाठी पात्र ठरला आहे.

### माऊलीने साकारलेल्या पुष्पाभाई स्टाईलची चर्चा

**गेवराई । प्रतिनिधी**

पुष्पा २ सिनामाचा क्रेझ इतका वाढला आहे की, ते उतरण्याचे नाव घेत नाही. जिथे पाहावे तिथे लोकं त्याच्या स्टाईलची आणि डान्सची कॉपी करताना पाहायला मिळत आहेत.

अल्लू अर्जुनच्या स्टाईल सोशल मीडियावर सतत ट्रेंड होताना दिसते. चित्रपट प्रदर्शित होऊन एक महिन्याहून अधिक काळ लोटला असला तरी त्याची चर्चा अजूनही कायम आहे. या चित्रपटामधील अल्लू अर्जुनची स्टाइलची रिल्स स्टार प्रचारक म्हणून सातत्याने सोशल नेटवर्किंग करणारे गेवराईतील माऊली पंडित यांची सोशल नेटवर्किंगवर फारच चर्चा असल्याचे दिसून येतंय. सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. सध्या या व्हायरल व्हिडीओची सर्वत्र चर्चा सुरू असताना पुष्पाभाई या भुमिकेत साकारलेले माऊली पंडित यांनी आपल्या स्टाईल मध्ये नविन उभारलेले वेगवेगळे दुकान यांच्या ऍडव्हर्टाईजसाठी ते नेहमीच कटिबद्ध असतात .

### जगद्गुरु श्री नरेंद्राचार्य महाराज यांचा आंबेजोगाई येथील पादुका दर्शन सोहळ्यामध्ये ५५ गोर गरीब व गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप

**आंबेजोगाई । प्रतिनिधी**



अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या दिव्य पादुकांचे दर्शन आंबेजोगाई येथे हजारो भाविक भक्तांनी घेतले सकाळी ८ ते संध्या. ९ वाजेपर्यंत पूर्ण दिवसभर कार्यक्रम सुरू होता. २८ जानेवारी रोजी, मंगळवारी आंबेजोगाई येथे सकाळीच ९ वाजता आंबेजोगाई येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मिरवणुकीला सुरुवात झाली मिरवणुकी मध्ये समोर बॅन्जो गाडी, त्याच्या पाठी मागे मिरवणुकीचा बॅनर, कलशधारी महिला, निशाण धारी महिला, संबळ पथक, निशाण धारी पुरुष, वासुदेव पथक, ५ घोडे आणि ६ ऊंट यांच्यावर महापुरुषांचे वेगवेगळे देखावे, भाजणी मंडळ, माऊलींचा रथ, ५ ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचे वेगवेगळे देखावे आणि त्यांच्या पाठीमागे इतर भक्तगण आशि मिरवणूक आंबेडकर चौक मार्गे कार्यक्रम स्थळी बारा वाजता पोहोचली. संत पिठावर आल्यावर स्वामींची आरती करण्यात आली, त्यानंतर बीड जिल्ह्यातील राजकीय मान्यवरांच्या हस्ते गोर गरीब व गरजू महिलांना ५५ शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

### राष्ट्रसंत गाडगे महाराज सार्वजनिक जयंती निमित्त बैठकीचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**



प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्या निमित्त या बैठकीत परिट समाज बांधवांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून रविवार, दि.९ फेब्रुवारी २०२५ रोजी शहरातील मोंढा भागातील राष्ट्रसंत गाडगे महाराज सांस्कृतिक सभागृह बीड येथे दुपारी १ वाजता ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. परिट समाज बांधवांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परिट-धोबी समाज सेवा मंडळाचे मराठवाडा विभागीय युवक अध्यक्ष ॲड. सुधिर जाधव यांनी केले आहे.

यावर्षी देशभरात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची १४९ वी जयंती २३ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरी होणार असून त्याच एक भाग म्हणून प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी परिट समाज बांधवांच्यावतीने जयंती उत्सव साजरा करण्यात येणार असून तत्पूर्वी बैठकी दरम्यान जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार आहे.



*बीड ॲड. राहुल नवले यांना भारत सरकारची नोटरी प्राप्त झाली याबद्दल त्यांच्या टेबलच्या उद्घाटन करून शुभेच्छा देताना ॲड. कदम आदी मान्यवर उपस्थित होते.*

# विविध क्षेत्रात मुलांना करिअरच्या संधी आहेत त्यांच्या कलानुसार मातांनी आपल्या मुला-मुलींना त्या क्षेत्रात जाण्यास प्रोत्साहित करावे: सरला रोकडे

**नेकनूर । प्रतिनिधी**



प्रत्येक मातेने पल्याच्या बाबतीत सजग असणे गरजेचे असते .स्त्री ही कुटुंबाचा कणा असते ,असे मत मातापालक सभेत बोलताना सरला रोकडे यांनी व्यक्त केले .येथील ग्रामीण माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात माता पालक सभेची आणि सी.सी.आर.टी.सांस्कृतिक क्लब अंतर्गत हळदीकुंकवाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी गावातील बहुसंख्य पालक माता उपस्थित होत्या .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या कदम के. के.या होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती सरला सदाशिव रोकडे या उपस्थित होत्या तसेच महिलांना आरोग्याचे मार्गदर्शन देण्यासाठी डॉक्टर शिल्पा सनतकुमार सोडगे यांची उपस्थिती होती .कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या फोटोस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात झाली .प्रथम श्रीमती गर्जे मॅडम यांनी रथसप्तमी चे महत्व सांगून त्याचे भारतीय संस्कृतीतील महत्व याचे मार्गदर्शन केले .नंतर डॉक्टर शिल्पा सनतकुमार सोंडगे यांनी मातांना उद्देशून बोलताना मुलींचे शारीरिक ,भावनिक बदल व त्यानुसार त्यांचा आहार कसा असावा याचे सखोल मार्गदर्शन केले. तसेच वेळेनुसार आरोग्य तपासण्या कराव्यात असेही त्यावेळी सांगितले .

आयुर्वेदातील संस्कृत सुभाषितांच्या दाखला देत आरोग्याची पौराणिक महत्त्व यावेळी त्विविध उदाहरणाच्या माध्यमातून सांगितले.

